॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/२६२ दिनांक ११/११/२०२४

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः– मतदान जनजागृती अभियान राबविणे बाबत.**

**संदर्भः–** रा.से.यो. क्षेत्रीय कार्यालय, पुणे यांचा दिनांक ११/११/२०२४ रोजीचा ई–मेल.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय ई–मेल अन्वये राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राज्यातील मतदारांच्या मतदानातील टक्केवारीच्या प्रमाणात वाढ होण्याच्या अनुषंगाने संलग्नीत महाविद्यालयातील रा.से.यो. स्वंयसेवकांमार्फत मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने मतदान जनजागृती अभियान राबविण्यात यावे असे कळविलेले आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहकार्यास्तव राष्ट्रीय सेवा योजना शिबीरांतर्गत मतदान जन जागतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. आपल्या महाविद्यालय व महाविद्यालया बाहेरील परिसरात जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण पध्दतीने जनजागृती, प्रसार–प्रचार करण्यात यावा. चौकाचौकात मतदान जागृतीस्तव पथनाटय, रॅली, फ्लेक्स इ. प्रभावी साधनांचा वापर करण्यात यावा. बॅनर फ्लेक्सवर MY BHARAT PORTAL चा LOGO दर्शनीभागावर प्रिंन्ट करावा. नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा यासाठी रा.से.यो. मार्फत उपाययोजना करण्यात याव्यात.

नागरिकांमध्ये मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीप SVEEP (Systematic Voter's Education and Electoral Participation) कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यानुषंगाने सदर स्वीप कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व रा.से.यो. संलग्नीत महाविद्यालया मधील निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करून त्याद्वारे मतदान विषयक उपक्रम राबविण्यात यावेत. मतदान जागृती विषयक सर्व उपक्रमांची MY BHARAT PORTAL वर नोंद घेणे क्रमप्राप्त असेल. जनजागृतीसाठी केलेल्या कृतीचे विविध प्रकारचे फोटो तसेच प्रत्येक कृती MY BHARAT PORTAL वर अपलोड करण्यात यावी. रा.से. यो. संलग्न विद्यापीठाने मतदान जनजागृतीसाठी केलेल्या सर्व प्रयत्नांचे संकलन एक ते दोन मिनिटांपर्यंतच्या व्हिडीओमध्ये करून सदर व्हिडीओ MY BHARAT PORTAL वर अपलोड करावा.

तरी रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय ई–मेलच्या अनुषंगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीतील मतदानाचा टक्का वाढविण्याबाबत आपल्या महाविद्यालयातील रा.से.यो. स्वंयसेवका मार्फत उपरोक्त निर्देशित केलेल्या सुचनांप्रमाणे मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल क्षेत्रीय संचालक, क्षेत्रीय संचलनालय, पुणे यांना तात्काळ सादर करावयाचा असल्यामुळे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, फोटो, व्हिडीओ रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर पाठविण्यात यावे, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

Scanned with OKEN Scanner